# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:03.02.2026** **वार:मंगळवार**

1. अमेरिकेनं आयात शुल्कात घट केल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा
2. संसदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात.
3. यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी रेल्वे प्रकल्पांकरिता सुमारे 24 हजार कोटी रुपयांची तरतूद
4. राज्यात विविध ठिकाणी महापौरपदासाठी उमेदवारांचे अर्ज दाखल आणि
5. पुण्यातल्या पोर्शे कार अपघात प्रकरणातल्या ३ आरोपींना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

**भारत-अमेरिका व्यापार**

भारतात उत्पादित झालेल्या अर्थात मेड इन इंडिया उत्पादनांवरच्या आयात शुल्कात अमेरिकेनं घट केली आहे; हे आयात शुल्क आता 18 टक्के होणार असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या समाज माध्यमांवरील संदेशात दिली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर पंतप्रधानांनी ही घोषणा केली आहे. आपले मित्र ट्रम्प यांच्याशी संवाद साधणे सुखद असल्याचं सांगत दोन मोठ्या अर्थव्यवस्था आणि दोन लोकशाही देश जेव्हा एकत्रित काम करतात तेव्हा त्याचा फायदा सामान्य नागरिकांना होतो, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. द्विपक्षीय भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी ट्रम्प यांच्यासमवेत काम करण्यास उत्सुक असल्याचंही मोदी यांनी नमूद केलं आहे.

**लोकसभा**

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला काल सुरूवात झाली. लोकसभेत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडला. देशाच्या भविष्याविषयी अतिशय प्रभावी दृष्टीकोन राष्ट्रपतींनी या भाषणात व्यक्त केला. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि विकसित भारताचं सरकारचं उद्दिष्ट यात प्रतिबिंबित होत असल्याचं सोनोवाल म्हणाले. या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी माजी लष्कर प्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकाशी संबंधित वक्तव्य केलं, यावर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज आधी 3 वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राहुल गांधी जनतेची दिशाभूल करत आहेत असा आरोप संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केला. राज्यसभेतही काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरू झाली. नामनिर्देशित सदस्य सी सदानंद मास्टर यांनी हा धन्यवाद प्रस्ताव मांडला; त्याला खासदार मेधा कुलकर्णी यांनी अनुमोदन दिलं.

**अश्विनी वैष्णव**

2026-27च्या रेल्वेच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी 23 हजार 926 कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिली. मुंबईत मध्य रेल्वेच्या मुख्यालयात झालेल्या वार्ताहर परिषदेला त्यांनी दूरस्थ पद्धतीने संबोधित केलं. राज्यात मुंबई ते पुणे आणि पुणे ते हैदराबाद या दोन बुलेट ट्रेन्सनाही या अर्थसंकल्पात मान्यता देण्यात आली असून हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या तिन्ही शहरांना खूप फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले.....

**दो नई बुलेट ट्रेन प्रोजेक्ट्स मिले हैं। एक तो मुंबई से पुणे और दूसरा पुणे से हैदराबाद और इसका बेनिफिट इतना होगा मुंबई से पुणे की यात्रा मात्र अड़तालीस मिनट की रह जाएगी और इसका बहुत बेनिफिट होगा पुणे और मुंबई प्रैक्टिकली एक शहर की तरह हो जाएंगे। पुणे से हैदराबाद जो की दोनों बहुत बड़े आईटी और मैन्युफैक्चरिंग और इलेक्ट्रॉनिक्स के हब है ये दोनों जुड़ जाएंगे एक घंटे पचपन मिनट की यात्रा रह जाएगी मात्र।**

अर्थसंकल्पात मान्यता मिळालेला नवा मालवाहतूक कॉरिडॉर राज्यातल्या वाढवण बंदरालाही जोडण्याची योजना असून यामुळे देशभरात मालवाहतुकीचं जाळं तयार होईल, असंही अश्विनी वैष्णव म्हणाले. राज्यात एकंदर 1 लाख 70 हजार कोटी रुपयांचे रेल्वेचे प्रकल्प सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगाने सुरू असून पुढच्या वर्षी ही ट्रेन सुरू होईल, याचा पुनरुच्चारही रेल्वेमंत्र्यांनी केला.

**<u>सुनेत्रा पवार</u>**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल सातारा जिल्ह्यातल्या कराड इथल्या प्रितीसंगमावर माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या समाधी स्थळी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विमान अपघातात मृत्यूमुखी पडलेले पोलीस कर्मचारी विदीप जाधव यांच्या कुटुंबीयांचीही त्यांनी भेट घेतली.

**<u>महापौर निवड</u>**

ठाणे जिल्ह्यातल्या ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर या तिन्ही महापालिकेत महिलांना महापौरपद देण्याचा निर्णय शिवसेनेनं घेतला आहे. ठाण्यातून शर्मिला पिंपळोलकर-गायकवाड, कल्याण डोंबिवलीत हर्षाली थविल चौधरी आणि उल्हासनगरमध्ये अश्विनी निकम यांची महापौरपदी नियुक्ती होणार आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या  महापौर  पदासाठी भारतीय जनता पक्षाचे रवी लांडगे तर उपमहापौर पदासाठी शितल शिंदे यांची नावे निश्चित करण्यात आली आहेत.

सोलापूर महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी भाजपचे विनायक कोंड्याल यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून, उपमहापौरपदासाठी ज्ञानेश्वरी देवकर यांचे नाव निश्चित करण्यात आलं आहे.

अहिल्यानगर महापालिकेत महापौरपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे, तर उपमहापौर पदासाठी भाजपचे धनंजय जाधव यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महापालिकेत इस्लाम पक्षातर्फे महापौर पदासाठी शेख नसरीन खालीद हाजी यांनी, तर उपमहापौर पदासाठी समाजवादी पक्षातर्फे शान-ए-हिंद यांनी अर्ज दाखल केला आहे.

कोल्हापूरमध्ये महापौरदासाठी भाजपानं रूपाराणी निकम यांच्या नावाची घोषणा केली आहे.
नागपूरमध्ये भाजपाच्या नीता ठाकरे यांनी महापौर पदासाठी तर लीला हाथीबेड यांनी उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज सादर केला.
काँग्रेसकडून महापौर पदासाठी स्नेहल ठाकरे तर उपमहापौर पदासाठी विवेक निकोसे यांनी अर्ज दाखल केले आहेत.

धुळे महापालिका महापौर पदासाठी भाजपाकडून मायादेवी परदेशी यांनी तर उपमहापौर पदासाठी ज्योत्स्ना पाटील यांनी अर्ज दाखल केले. तसंच शिवसेनेच्या गिता नवले यांनी महापौर पदासाठी आणि इरफान फजलु अन्सारी यांनी उपमहापौर पदासाठी अर्ज भरला आहे.

चंद्रपूर महापालिका महापौर पदाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून त्याआधी काँग्रेस महासचिव के. सी वेणुगोपाल यांच्याबरोबर दिल्लीत बैठक होणार आहे. या बैठकीनंतर तोडगा निघेल असं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

अमरावतीमध्ये भाजपनं श्रीचंद तेजवानी यांना महापौरपदाची उमेदवारी जाहीर केली आहे.

जळगाव महानगरपालिकेत महापौरपदी भारतीय जनता पक्षाच्या दीपमाला काळे यांची, तर उपमहापौर म्हणून शिवसेनेच्या मनोज चौधरी यांची निवड निश्चित झाली आहे.

**<u>संरक्षण</u>**

संरक्षण लेखा विभागातील प्रशासन आणि निर्णयप्रक्रिया अधिक सक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा वापर वाढवण्यात येत असल्याचं संरक्षण लेखा महानियंत्रक विश्वजीत सहाय यांनी सांगितलं. संरक्षण विभागाच्या राष्ट्रीय वित्त व्यवस्थापन प्रबोधिनीचा पायाभरणी समारंभ काल पुण्यात पार पडला; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज शेठ उपस्थित होते. नव्या प्रशिक्षण केंद्रात भारतीय संरक्षण लेखा सेवा अधिकाऱ्यांसाठी दीर्घकालीन व्यावसायिक प्रशिक्षण शक्य होणार आहे.

**<u>अजित पवार-श्रद्धांजली</u>**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना नवी दिल्लीतल्या महाराष्ट्र सदनातील अधिकारी आणि कर्मचारी, मराठी अधिकारी आणि माध्यमकर्मींच्या वतीने काल श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी अजित दादांच्या आठवणींना उजाळा दिला.
दिवंगत अजित पवार यांच्या अस्थींचं काल नाशिकच्या रामकुंडावर विधिवत विसर्जन करण्यात आलं. यावेळी मंत्री छगन भुजबळ आणि नरहरी झिरवाळ उपस्थित होते.

**जिल्हा परिषदा पंचायत-निवडणुका**

राज्यातल्या 12 जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत 125 पंचायत समित्यांमध्ये येत्या शनिवारी, 7 फेब्रुवारी रोजी सार्वत्रिक निवडणूका होणार आहेत. या निवडणुकीत राज्यातल्या आणि राज्याच्या सीमेलगतच्या भागातल्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग, आस्थापना आणि कारखान्यांनी आपले कामगार आणि कर्मचाऱ्यांना या दिवशी भरपगारी सुट्टी अथवा सवलत देणं बंधनकारक आहे. उद्योग, उर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागानं काल याबाबतचं परिपत्रक जारी केलं आहे.

**पुरस्कार-नाशिक**

कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या गोदावरी गौरव पुरस्कारांची काल नाशिकमध्ये घोषणा करण्यात आली. अभिनेते आणि सह्याद्री देवराईकार सयाजी शिंदे, अभिनेते प्रशांत दामले, विज्ञान क्षेत्रातील कामगिरी बद्दल डॉ. अनिरूध्द पंडित, चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी, संगीत क्षेत्राबद्दल उस्मान खान आणि साहस प्रकारात आशिष माने यांची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. 21 हजार रूपये, मानचिन्ह, सन्मानपत्र असं पुरस्कारांचं स्वरूप आहे. येत्या 10 मार्च रोजी कुसूमाग्रज स्मरण दिनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष वसंत डहाके यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पुरस्कार-अहिल्यानगर**

यंदाचा राज्यस्तरीय पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील स्मृती संत सेवा पुरस्कार
जेष्ठ कीर्तनकार गोपाळ महाराज उरळकर यांना जाहीर झाला आहे. येत्या 6 मार्च रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात लोणी इथं हा पुंरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचं निवड समितीचे अध्यक्ष महंत उद्धव महाराज मंडलिक, नेवासेकर यांनी काल सांगितलं.

**पोर्श कार-केस**

पुण्यात 2024 मध्ये झालेल्या पोर्श कार अपघात प्रकरणातल्या तीन आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने काल जामीन मंजूर केला. सतीश गायकवाड, आदित्य सूद आणि आशीष मित्तल अशी या तीन आरोपींची नावं आहेत. 19 मे 2024 रोजी पुण्यात एका अल्पवयीन मुलानं मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवताना धडक दिल्यामुळे दोघांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी रक्ताचा नमुना बदलणं, तसंच सहआरोपींच्या रक्ताच्या चाचण्यांसाठी आपल्या रक्ताचे नमुने देणं, असे आरोप या तिघांवर आहेत.

**हवामान-**

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज तुरळक ठिकाणी पाऊस तर कोकण आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.